( सामान्य प्रशासन विभाग जिल्हा परिषद )

## जिल्हा परिषदे मधील निरुपयोगी भंगार वस्तुंचा जाहिर लीलाव सुचना.

सर्व जनतेच्या माहितीसाठी या सुचनेव्दारे जाहीर करण्यात येते की, अमरावती जिल्हा परिषद मालकीच्या तसेच ताब्यातील निरुपयोगी विनावापर भंगार वस्तुची जाहीर लिलावाव्दारे दिनांक २३/ ०८ / २०२४ वेळ दुपारी १२.०० वाजल्या पासुन खालील दिलेल्या ठिकाणी भंगार वस्तुची विक्री करावयाची आहे.

| अ. क्र. | विभागाचे नांव | लिलावाव्दारे निकालात काढावयाचे एकुण साहित्य | हर्रास दिनांक | वस्तु पहावयाचे ठिकाण |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ५ | ६ |
| १. | सामान्य प्रशासन विभाग, जि.प.अमरावती | कार्यालयीन ऑफीस टेबल,खुर्ची,लोखंडी कपाट,लोखंडी रॅक इत्यादी | २३/८/२०२४ | जिल्हा परिषद गोडाऊन पोलीस स्टेशन जवळ नांदगाव पेठ ता.जि. अमरावती<br><br>दि. १६/८/२०२४ ते २२/८/ २०२४ पर्यंत कार्यालयीन कामकाजाचे दिवशी ११ ते ५ वाजेपर्यंत पाहवयास उपलब्ध राहील) |
| | | कार्यालयीन तुटलेले कुलर, वॉटर कुलर ,लाकडी खुर्ची,लाकडी कपाट, लाकडी रॅक इत्यादी | | |
| | | कार्यालयीन वाहनाचे स्पेअर्स पार्ट,वाहनाचे टायर्स,बॅटरीस | | |
| | | खराब झालेले संगणक,प्रिटंर्स,युपीएस बॅटरी | | |
| | | खराब झालेले टेलीफोन इतर प्लॉस्टीक चेअर ,टेलीफोन, फॅक्स मशिन | | |

- लिलावाच्या अटी व शर्ती सविस्तरपणे जिल्हा परिषद,अमरावती च्या www.zpamravati.in या संकेतस्थळावर किंवा कार्यालयामध्ये कार्यालयीन दिवशी दिनांक १६/८/२०२४ पासुन पाहावयास मिळेल. त्याप्रमाणे उपरोक्त साहित्य लिलावाचे दिवशी व ठिकाणी वितरीत करुन वाचुन दाखविण्यात येईल.

तरी इच्छूक बोलीदाराने लिलावाचे तारखेस व वेळी उपस्थित राहावे.

Sanjita

(संजीता माहपात्र भाप्रसे)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद,अमरावती

Scanned with AltaScanner

# भंगार निरुपयोगी लिलावाच्या शर्ती व अटी.

१. सक्षम अधिकारी यांचे वतीने हर्रास करण्यात येत आहे. त्या अधिकाऱ्यास हर्रासाची समिती नेमण्याचा अधिकार राहील, समितीचे देखरेखी खाली हर्रासाची कार्यवाही होईल व हर्रासाचे ठिकाणी समितीचा निर्णय अंतिम राहील.

२. इच्छूक बोलीदारांना लिलावात काढलेले साहित्य लिलावापुर्वी आठ दिवसा पासुन पाहवयास मिळतील बोलीदारांनी मालाची तपासणी केली आहे. असे गृहीत धरण्यात येऊन नंतर मालाबाबत कोणतीही तक्रार स्विकारली जाणार नाही.

३. कोणत्याही बोलीदाराची बोली कारणाशिवाय स्विकारणे अथवा नाकारणे याबाबतचे अधिकार समितीस राहील व समितीने घेतलेला निर्णय हा अंतिम निर्णय राहील.

४. लिलावात बोली बोलण्यापुर्वी रु. २०००/- ची अनामत रक्कम जमा करावी लागेल त्याशिवाय बोलीमध्ये भाग घेता येणार नाही.

५. सर्वाधिक बोली बोलणाऱ्या इसमास लिलाव अधिकाऱ्याकडे यशस्वी बोलीच्या ५० टक्के इसार किंवा पुर्ण रक्कम रोखीने त्वरीत भरावी लागेल ती न भरल्यास अनामत रक्कम जप्त करण्यात येईल व सदर बोली रद्द करण्यात येऊन मालाचा पुन्हा लिलाव करण्यात येईल.

६. लिलाव केल्यानंतर व लिलाव कायम केल्याबद्दल बोलीदारास कळविण्यात आल्यापासुन ५ दिवसाचे आंत उर्वरीत रक्कमेचा भरणा करणे आवश्यक आहे. उर्वरीत रक्कम १० दिवसांच्या मुदतीत न भरल्यास १३ टक्के दराने व्याज आकारण्यात (व्याज प्रती दिन परिगठीत करावयाचे आहे) येईल अशी एकुण १५ दिवसाचे आत उर्वरीत रक्कम न भरल्यास अनामत रक्कम व इसाऱ्यची रक्कम जप्त करण्यात येऊन विक्री रद्द करण्यात येईल.

७. बोलीदाराने पुर्ण रक्कमेचा भरणा केल्यावर संबंधित साहित्य जिल्हा परिषद अमरावती गोडाऊन नांदगाव पेठ ता.अमरावती येथील चे प्रांगणातुन १० दिवसाचे आंत कार्यालयीन दिवशी व कार्यालयीन वेळेत ताब्यात घ्यावे तद्नंतर प्रतिदिन रु. १००/- (रु. शंभर फक्त) दंड आकारण्यात येईल. ३० दिवसाचे आत माल ताब्यात न घेतल्यास समितीला लिलाव रद्द करण्याचा अधिकार राहील संबंधित लिलाव खरेदीदाराची अनामत रक्कम व ३० दिवसाची दंडाची रक्कम वसुल करुन उर्वरीत रक्कम परत करण्यात येईल.

८. लिलाव खरेदी दाराने माल ताब्यात घेतांना जिल्हा परिषदेच्या / इमारतीचे / मालमत्तेचे नुकसान झाल्यास खरेदीदाराला झालेल्या नुकसानीबाबत जबाबदार धरण्यात येवुन नुकसान भरपाई वसुल करण्यात येईल.

९. यशस्वी बोलदाराला विकत घेतलेले साहित्याचे खरेदीच्या रक्कमेवर नियमानुसार विक्रीकर, व्हॅट व इतर सर्व प्रकारचे कर व शुल्क भरणे आवश्यक राहील. कोणतेही सुट मिळण्याचे प्रमाणपत्र लिलाव खरेदीदाराला मिळणार नाही.

१०. एकदा जाहीर केलेल्या साहित्याचा लिलाव कोणतेही कारण न देता वेळेवर स्थगित करण्याचा अधिकार लिलाव समितीस असतील.

११. यशस्वी बोलीदाराची रक्कम सोडून इतर बोलीदाराची अनामत रक्कम शक्यतोवर त्याच दिवशी परत करण्यात येईल.

१२. जाहीर लिलावात जर शासनाने /समितीने ठरविलेल्या किमान वाजवी किंमती पेक्षा कमी किंमत येत असल्यास नव्याने जाहीर लिलाव करण्याचे अधिकार समितीस राहील.

(signature)

मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद,अमरावती

Scanned with AltaScanner